क्र.२/नसचि/महासभा/ ०६ /२०१७-२०१८
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २४ नोव्हेंबर २०१७

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०६ /२०१७-२०१८

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक ०५/१२/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

24.11.2017
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.०५/१०/२०१७ रोजीची तहकूब सभा दि.०९/१०/२०१७ रोजीच्या सभेचे व दि.२३/१०/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दुःखवट्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगपालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.११२८४ मधील व्यायाम शाळेची देखभाल दुरुस्ती,खुली जागा विकासीत करणेस रत्ना डेव्हलपर्स,सांगली यांना भाडे तत्वावर देणेसाठी सहा.संचालक,नगररचना यांनी निश्चित केले वार्षिक रु.रु.२,५४,६२६/- मात्र (अधिक सेवाकर) प्रमाणे वार्षिक भाडेनुसार प्रतिवर्ष १५% भाडेवाढ करुन, दर तीन वर्षानी पुर्नमुल्यांकन करुन भाडेमुल्य सुधारित करुन घेवून ९ वर्षे मुदतीने महापालिका शर्ती-अटीनुसार भाड्याने देणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२४/०७/२०१६ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका मिरज पोस्ट ऑफिस समोरील बंद जकात नाक्याची इमारत पोलीस कर्मचारी यांचे कामकाजाकरीता तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि. २५/१०/२०१७ चे विषयपत्र.**

...२...

६. महानगरपालिका मिरज मनपा कार्यालय आवारातील उत्तर बाजूची १५x३० या मापाची खुली जागा श्री.अशोक बाबूराव मोरे यांच्या ताब्यातील जागेचे वार्षिक भुई भाडे र.रु.५०,८११/- व श्री.परशुराम शिवाजी चोरगे यांचे ताब्यातील जागेचे वार्षिक भुई भाडे र.रु.३३,८७४/- मात्र लागू करुन, महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार सदर खुल्या जागांची ९ वर्षाकरीता दर तीन वर्षाने २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२१/११/२०१७ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिका सार्व.बांधकाम सांगली विभागाकडील मेस्त्री या पदावरील कायम सेवक श्री.चंद्रशेखर तुकाराम वादवणे यांचा मुलगा कु.वरद चंद्रशेखर वादवणे यांचेवर हृदयशस्त्रक्रियेवर आलेले वैद्यकीय र.रु.१,९५,०००/- मात्र खर्चा पैकी ९०% देय होणारी र.रु.१,७५,०००/- मात्र आदा करणेस व महासभा ठराव क्र.३६७ दि.२०/०२/२०१३ रोजी कलम १(ज) अन्वये पारित करणेत आलेला ठरावाच्या अनुषंगाने धोरण निश्चित करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२५/०९/२०१७ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभाग सांगली कडील सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक श्रीमती सुवर्णा आण्णा पाटील यांना मा.शासन निर्णयानुसार सुधारीत वेतन अनुषंगिक लाभ देणेस तसेच, वयोमर्यादा अट शिथील करणेस मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०९/२०१७ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह,सांगली येथे सिझेरियन शस्त्रक्रिया चालू करणेसाठी आवश्यक असणाऱ्या तज्ञ डॉक्टर यांना स्त्रीरोग तज्ञ रु.३२००/-, भूलतज्ञ रु.१८००/-, फिजिशियन रु.५००/- याप्रमाणे मानधन आदा करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०८/११/२०१७ चे विषयपत्र.**

१०. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

११. मा.महापौर, यांचे संमतीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

24.11.2017

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०६/२०१७-१८

महापालिका सभा दिनांक ०५/१२/२०१७ करीता.

मंगळवार दि.०५/१२/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव:-

महानगरपालिका क्षेत्रातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर नियोजित स्मारका समोरील कुंड-धोकादायक मुजवून त्या ठिकाणी उद्यान विकसीत करणेकामी चर्चा होवून धोरणात्मक मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.संजय नायकू [illegible] यांनी दिलेला प्रस्ताव:-

महानगरपालिका मिरज शहरातील जवाहर हायस्कूल समोरील सार्व.शौचालय पाडणे अत्यंत आवश्यक आहे. सदर शौचालय धोकादायक असल्याने पाडणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका क्षेत्रातील (१) सांगली येथील संभाजी कॉलनी टिंबर एरिया सांगली येथे स्वागत उभा करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी (२) सांगली शिंदेमळा येथे आठवडा बाजार सुरु करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.सौ.अश्विनी हेमंत खंडागळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२० मधील रिसाला रोड रेवणी रोड येथील वाल्मिकी म्हेतर समाज वैरण बाजार येथील १८ सोटचे जुने शौचालय पाडणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

५. मा.शिवाजी बाबूराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेच्या मिरज वॉर्ड क्र.१२ एल.आर.भोसले घर ते बसवेश्वर चौक या रस्त्यास आबासाहेब राजपुत असे नामकरण करणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

६. मा.कांचन युवराज कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.३, १०० फुटी संजयनगर महापालिका ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसीत होत असल्याने, त्या ठिकाणी असलेली धोकादायक मुतारी काढणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

७. मा.धनपाल तात्या खोत यांनी दिलेला प्रस्ताव :-

१. महापालिका हद्दीतील कुपवाड येथील कुबेर किराणा स्टोअर्स ते अभय पाटील (भोसेकर) २० फुटी रस्त्यास व आकाराम भाट घर ते आण्णा रामगोंडा पाटील घरापर्यंतच्या रस्त्यास स्वा.सैनिक दे.भ.आण्णा नेमाण्णा कोथळे नामकरण करणेस धोरणात्मक मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२. महापालिका हद्दीतील कुपवाड येथील महावीर व्यायाम मंडळाशेजारील चौकास आचार्य श्री.१००८ भगवान महावीर चौक असे नामकरण करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

८. मा.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका हद्दीतील कुपवाड येथील मिरज कुपवाड रस्त्यावरील वसंत धरकुल शेजारी स्वामी मळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असणाऱ्या चौकास थोरला गणपती चौक असे नामकरण करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ०२/१२/२०१७.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १७

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.०६/१०/२०१७ रोजीची तहकूब सभा दि.०९/१०/२०१७ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.५३ ते ठराव क्र.९० हे आणि विशेष सभा दि.२३/१०/२०१७ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.९१ ते ठराव क्र.९६ हे सभागृहा मध्ये वाचून दाखविणेत आले. त्यापैकी दि.०६/१०/२०१७-०९/१०/२०१७ रोजीच्या सभेतील ठराव क्र.८० बाबत सर्वानुमते दुरुस्ती सुचविणेत आली. त्याप्रमाणे सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांचे मत विचारात घेवून ठराव क्र.८० मध्ये दुरुस्ती करणेचे ठरविणेत येवून, त्याबाबत दुरुस्तीचा ठराव याच इतिवृत्तामध्ये वेगळा करणेत येत असून, त्या दुरुस्तीसह सर्व सभेचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

१) महासभा लिपीक
२) प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- ०१

मागील सभेचे कार्यवृत्त कायम करीत असताना सन्मा.सदस्य श्री.शेखर विश्वास माने व श्री.संतोष शिवदास पाटील यांनी सूचीत केलेनुसार महासभा दि.०६/१०/२०१७-०९/१०/२०१७ रोजीच्या सभेतील ठराव क्र.८० अन्वये पारित करणेत आलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प चांगल्या प्रकारे राबविला जाणेकरीता सदर DPR वर सविस्तर चर्चा करणेत आली. त्यानुसार महासभा ठराव क्र.८० मध्ये खालील प्रमाणे सर्वानुमते दुरुस्ती करणेत येत आहे.

मा.शेखर माने :-

१. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबवित असताना त्याचा कोणत्याही प्रकारचा बोजा सामान्य नागरीकांचेवर पडणार नाही याची दक्षता घेणेत यावी. तसेच, प्रस्तुतचा प्रकल्प महापालिकेमार्फत राबविणेत यावा. कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण करणेत येवू नये. महापालिकेमार्फतच प्रकल्प राबविणेत यावा.

२. घरोघरी व व्यावसायिकांचेकडून कचरा गोळा करणे व संकलन करणेत येणार असल्याने, त्याच्या मोबदल्यात युजर्स चार्जेस जे DPR मध्ये समाविष्ठ आहेत त्याची अंमलबजावणी करणेत येवू नये. घनकचरा व्यवस्थापन महानगरपालिकेकडून पूर्ण क्षमतेने सक्षमपणे राबविण्यात यावा. नागरिक व व्यावसायिकांचेकडून फी आकारणेत येवू नये.

३. सदर DPR (प्रकल्प आराखड्यामध्ये) कचरा डेपोचे समाडोळी रोड व बेडग या दोनच जागा निश्चित केलल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी तसे न करता भागप्रमाणे तिन्ही शहरात ठिकठिकाणी कचरा संकलन व प्रक्रिया केंद्र करीता जागा निश्चित कराव्यात. त्यामुळे वाहतुक व कर्मचारी मध्ये बचत होईल.

४. महापालिकेच्या जुन्या यंत्रसामुग्रीचा नव्याने राबविण्यात येणारे घनकचरा व्यवस्थापन मध्ये राबविण्यात यावे.

५. ई-कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करणेत यावे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनास मदत होणार आहे.

६. सदर DPR मध्ये बदल करण्याचे परवानगी करीता मा.हरित न्यायालयात रिव्हिव्ह्यु ॲप्लीकेशन दाखल करणेत यावे.

७. नविन अद्यावत तंत्रज्ञान वापर सदर घनकचरा व्यवस्थापनासाठी करण्यात यावा व कचरा निर्मुलन करीता वेगवेगळे यशस्वी प्रकल्प राबविण्यात यावेत.

... २ ...

८. ५० मायक्रो प्लॉस्टिक पिशवी बंदीची अंमलबजावणी महापालिका क्षेत्रात कडक करावी.

मा.संतोष पाटील :-

९. महापालिका क्षेत्रातील दैनंदिन कचरा कचरा उठाव करणेसाठी (बॅटरीवरील) ई- रिक्षा घंटागाडी ४० नग खरेदी करणेत याव्यात.

१०. महापालिका क्षेत्रातील प्रत्येक घरासाठी आरोग्य विभागाकडून सर्व्हे करणेत येवून, सर्व्हे केलेनुसार प्रत्येकी दोन बकेटस् स्टॅडर्ड कंपनीचे खरेदी करणेत यावेत. जेणेकरुन ओला व सुका कचरा संकलीत करणेस सुलभ होईल.

११. महापालिकेच्या सांगली व मिरज विभागासाठी स्वतंत्र दोन पोकलॅन मशिन व टॅक्ट्रर ट्रॉली खरेदी करणेत याव्यात.

उपरोक्त बाबींचा समावेश महासभा ठराव क्र.८० दि.०६/१०/२०१७-०९/१०/२०१७ रोजीच्या सभेने पारित केलेल्या ठरावामध्ये करणेस ही सभा मान्यता देत असून, त्याप्रमाणे योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (मा.किशोर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

अनुमोदक :- (मा.संतोष पाटील)

आरोग्याधिकारी,

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १०५

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि. २५/१०/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका मिरज पोस्ट ऑफिस, रेल्वे स्टेशन येथील जकात नाक्याची इमारत जकात बंद झालेपासून बंद अवस्थेत असून, सदर इमारतीची दुरावस्था होत आहे. सदर इमारत बंद अवस्थेत असल्याने त्याचा दुरोपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिक व वाहनांची सतत वर्दळ असल्याने, त्या परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांचेवर तात्काळ कारवाई करणे सोईचे होईल व त्या परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहणेच्या दृष्टीने मिरज पोस्ट ऑफिस समोरील बंद जकात नाक्याची इमारत महापालिकेस आवश्यकता भासलेस, ती तात्काळ रिकामी करुन देणेच्या अटीवर पोलीस निरिक्षक यांनी मागणी केलेनुसार पोलीस कर्मचारी यांचे कामकाजाकरीता तात्पुरत्या स्वरुपात वापरणेस देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १०४

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२४/०७/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगपालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.११२८४ मधील व्यायाम शाळेची देखभाल दुरुस्ती,खुली जागा विकासीत करणेस रत्ना डेव्हलपर्स,सांगली यांना भाडे तत्वावर देणेसाठी सहा.संचालक,नगररचना यांनी निश्चित केले वार्षिक र.रु.२,५४,६२६/- मात्र (अधिक सेवाकर) प्रमाणे वार्षिक भाडेनुसार प्रतिवर्ष १५% भाडेवाढ करुन, दर तीन वर्षांनी पुर्नमुल्यांकन करुन भाडेमुल्य सुधारित करुन घेवून ९ वर्षे मुदतीने महापालिका शर्ती-अटीनुसार भाड्याने देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १०६

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२१/११/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका मिरज मनपा कार्यालय आवारातील उत्तर बाजूची १५x३० या मापाची खुली जागा श्री.अशोक बाबूराव मोरे यांच्या ताब्यातील जागेचे वार्षिक भुई भाडे र.रु.५०.८११/- व श्री.परशुराम शिवाजी चोरगे यांचे ताब्यातील जागेचे वार्षिक भुई भाडे र.रु.३३,८७४/- मात्र लागू करुन, महापालिकेच्या शर्तो-अटीनुसार सदर खुल्या जागांची २९ वर्षाकरीता दर तीन वर्षाने २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर मुदतवाढ देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने मा.शेडजी सुभराव मोहिते यांनी दिलेली सूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड हद्दीतील स.नं.४७५/१ मधील खुली जागा सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीची असून, त्यामध्ये महानगरपालिकेने खुले नाट्यगृहाचे बांधकाम केले आहे. सदर इमारत व परिसर देखभाल व दुरुस्ती करणे च्या अटीवर स्नेहजीत प्रतिष्ठान, कुपवाड यांना ९ वर्ष मुदतीने यापूर्वी महासभा ठराव क्र.७० दि.१२/०७/२०१२ अन्वये देणेत आलेली होती. उपरोक्त ठरावामध्ये नमुद असले अटीनुसार सदरची जागा स्नेहजीत प्रतिष्ठान, कुपवाड यांना मुदत संपले दिनांकापासून पुढे २९ वर्ष मुदतीने देणेस ही सभा मान्यता देत आहे. या ठिकाणी व्यावसाईक स्वरुपाची कार्यक्रम होतांना त्यांचे भाडे म.न.पा.कडे जमा करणेत यावे. असे ही सभा सुचित करीत असून, इतर कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानने आपल्या परीने नाट्यगृह उपलब्ध करुन द्यावे असे ही सभा आदेशीत करीत आहे.

... २ ...

उक्त विषयाच्या अनुषंगाने मा.शिवराज श्रीशैल्य बोळाज यांनी दिलेली उसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून हो सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली येथील शाळा नंबर १० च्या पूर्व बाजूस असणाऱ्या गेटला लागून असणारी उत्तर बाजूकडील असलेल्या खुल्या जागेत व शाळा नं.१ च्या जागेत विनापरवाना व विना मोबदला चहाचे व शितपेय विक्रीचे गाडे लावले जातात. सदर ठिकाणची जागा रितसर अनुक्रमे अश्विन शेट्टी व विवेक रणदिवे यांना भुई भाड्याने दिलेस महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडणार असून, त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही व जागा भाड्याने दिलेस जागेची निगा राहिल. यासाठी प्रशासनाने आवश्यक तो प्रस्ताव तात्काळ सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

आयुक्त तथा व्यवस्थापक,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १०७

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२५/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका सार्व.बांधकाम सांगली विभागाकडील मेस्त्री या पदावरील कायम सेवक श्री.चंद्रशेखर तुकाराम वादवणे यांचा मुलगा कु.वरद चंद्रशेखर वादवणे यांचेवर हृदयशस्त्रक्रियेवर आलेले वैद्यकीय र.रु.१,९५,०००/- मात्र खर्चा पैकी ९०% देय होणारी र.रु.१,७५,०००/- मात्र आदा करणेस व आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना प्रस्तुत योजनेचा लाभ देणेकामी धोरण निश्चित होवून मिळणेस प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. झाले चर्चेनुसार महापालिका आर्थिक उत्पन्न विचारात घेता, आस्थापना खर्च मर्यादेपेक्षा जास्त होत असल्याने सद्यस्थितीत प्रस्तुत प्रकरणी आस्थापना सर्व कायम कर्मचारी यांचे नातेवाईकांना प्रस्तुत योजनेचा लाभ देणे योग्य होणार नाही. परंतु, आस्थापनेवरील कायम सफाई कर्मचारी यांचे नातेवाईकांना प्रस्तुत योजनेचा लाभ देणे उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, आस्थापनेवरील कायम सफाई कर्मचारी यांचे नातेवाईकांना प्रस्तुत योजनेचा लाभ देणेस ही सभा मान्यता देत असून, याबाबत मा.शासन निर्णयानुसार योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासन अधिकारी (भाप्रसे.)

महानगरपालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १०८

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभाग सांगली कडील सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक श्रीमती सुवर्णा आण्णा पाटील यांना मा.शासन निर्णयानुसार सुधारीत वेतन अनुषंगिक लाभ देणेस तसेच, वयोमर्यादा अट शिथील करणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :-

प्रशासन अधिकारी (भाव्या.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १०९

विषय क्रमांक :- ०९

सोबतची उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०८/११/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह,सांगली येथे सिझेरियन शस्त्रक्रिया महापालिकेमार्फत मोफत पुरविणेत येणार असल्याने, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या स्त्रीरोग तज्ञ, भूलतज्ञ आणि फिजिशियन तज्ञ मानद डॉक्टर्स यांनी मानधन स्वरुपात सेवा देणेस तयार असलेने, बाह्य तज्ञ मानसेवी डॉक्टरांनी त्यांच्यामध्ये ठरविलेल्या वार व वेळ यानुसार सदरची सेवा उपलब्ध करुन देणेची आहे. मानसेवी डॉक्टर उपलब्ध नसतील तर वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचे मार्फत आवश्यकतेनुसार अन्य उपलब्ध बाह्यतज्ञ डॉक्टरांचेकडून सदरची सेवा उपलब्ध करुन देणेची आहे.

सबब, पुढील तज्ञ मानद डॉक्टर्स यांनी मानधन स्वरुपात सेवा देणेस तयार असलेले डॉ.बी.एम.पाटील, डॉ.विवेक कुलकर्णी आणि डॉ.सचिन पाटील यांना रु.३२००/-, भूलतज्ञ डॉ.सौ.स्मिता ऐनापुरे, डॉ.मालगावे आणि डॉ.स्मृती देशपांडे यांना रु.१८००/-, फिजिशियन डॉ.धनपाल ऐनापुरे यांना रु.५००/- याप्रमाणे मानधन आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.दिगोर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. झहीर नाईकवडी)

महापौर,

आरोग्याधिकारी,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- ११०

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर नियोजित स्मारका समोरील कुंड धोकादायक मुजवून त्या ठिकाणी उद्यान विकसीत करणेकामी चर्चा होवून धोरणात्मक मान्यता देणेकामी आलेला प्रस्तावाचे कामी प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता,

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- १११

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.संजय नायकू मेंढे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका मिरज शहरातील जवाहर हायस्कूल समोरील सार्व.शौचालय पाडणे अत्यंत आवश्यक आहे. सदर शौचालय धोकादायक असल्याने पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली असूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.२२ मधील मार्केट यार्ड कब्रस्तान जवळ नविन शौचालय बांधणेत आले आहे. त्याच ठिकाणी एक जुने शौचालय असून, सदर शौचालय विनावापर असल्याने त्याचा नागरिकांना उद्रव व त्रास होत आहे. यासाठी सदरचे शौचालय पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने मा.किशोर दादासाो जामदार यांनी दिलेली असूचना व विषयपत्र दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.२० वैरण बाजारातील जुने व वापरात नसलेले शौचालय तसेच, मिरज येथील वॉर्ड क्र.२७ मधील किल्लाभाग पाण्याच्या टाकीलगतची, नृसिंह मंदिरजवळची, शौचालये व आब्बास सायकल दुकान, कलंगडे घराशेजारील मुतारी व वॉर्ड क्र.१३ मध्ये सांगली वेस येथील दोन शीटची मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मा.सेवाविकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- ११२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील (१) सांगली येथील संभाजी कॉलनी टिंबर एरिया सांगली मुकांम्बिका टि-स्टॉल पासून भिमनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर बुधवार आठवडा बाजार येथे मुख्य मार्गावर विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाची भव्य कमान उभी करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी (२) सांगली शिंदेमळा, जलाराम अपार्टमेंट या परिसरामध्ये रविवार आठवडा बाजार सुरु करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेल्या दोन्ही प्रस्तावाचे कामी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (जगन्नाथ बापू ठोकळे)

अनुमोदक :- (बाबासाहेब जगन्नाथ कोंडुभाऊ)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

१) मालमत्ता व्यवस्थापक,
२) शहर अभियंता,
३) आरोग्याधिकारी

महापालिका सांगली, मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- ११३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सौ.अश्विनी हेमंत खंडागळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२० मधील रिसाला रोड रेवणी रोड येथील वाल्मिकी म्हेतर समाज बैरण बाजार येथील १८ सीटचे जुने शौचालय पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

वैद्य. आरोग्याधिकारी

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- ११४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.शिवाजी बाबूराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या मिरज वॉर्ड क्र.१२ एल.आर.भोसले घर ते बसवेश्वर चौक या रस्त्यास आबासाहेब राजपुत असे नामकरण करणेस निर्णय घेणेकामी आलेल्या प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इराद्या प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- शि.बा.दुर्वे

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महासभा व्यवस्थापक,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- ११५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सौ.कांचन युवराज कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.३, १०० फुटी संजयनगर महापालिका ओपन स्पेसमध्ये उद्यान विकासीत होत असल्याने, त्या ठिकाणी असलेली धोकादायक मुतारी काढणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- ११६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.धनपाल तात्या खोत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. महापालिका हद्दीतील कुपवाड येथील कुबेर किराणा स्टोअर्स ते अभय पाटील (भोसेकर) २० फुटी रस्त्यास व आकाराम भाट घर ते आण्णा रामगोंडा पाटील घरापर्यंतच्या रस्त्यास स्वा.सैनिक दे.भ.आण्णा नेमाण्णा कोंडळे नामकरण करणेस धोरणात्मक मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव

२. महापालिका हद्दीतील कुपवाड येथील महावीर व्यायाम मंडळाशेजारील चौकास आचार्य श्री.१००८ भगवान महावीर चौक असे नामकरण करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

उपरोक्त दोन्ही प्रस्तावाप्रमाणे नामकरण करणेस निर्णय घेणेकामी आलेल्या प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- ०५/१२/२०१७
१८/१२/२०१७

ठराव क्रमांक :- **११७**

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका हद्दीतील कुपवाड येथील मिरज कुपवाड रस्त्यावरील वसंत घरकुल शेजारी स्वामी मळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असणाऱ्या चौकास थोरला गणपती चौक असे नामकरण करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेल्या प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.शेडजी मोहिते)

अनुमोदक :- (मा. आशा शिंदे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महासभा अवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका